जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुवि/६८०८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :- १ यांचे कार्यालय.
दि. :- 15 JUN 1996

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- प्रथम मान्यता.
कन्या प्रशाला, वाकण, ता. खेड.

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ई-४/९४-९५, दिनांक १५.७.९५

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३, अन्वये क्रांती शिक्षण संस्था, वाकण. संस्थेच्या कन्या प्रशाला, वाकण, ता. खेड, जि. पुणे. माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी /९वी /१०वी च्या वर्गास सन १९९४ - १९९५ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९४ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावर प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१० ] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११ ] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२ ] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३ ] विद्यार्थिनी संख्या वाढवावी.
१४ ]
१५ ]

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक, कन्या प्रशाला, वाकण,
ता. खेड, जि. पुणे.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९५
पुणे, दि. १५/८/९५

प्रति,

BOOK-POST

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

कन्या प्रशाला, चाकण
ता. खेड, जि. पुणे

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९५-९६, ~~इ. ६ वी~~, ~~७वी~~, ९वी, ~~१०वी~~.

आपल्या क्रांती शिक्षण संस्था संचालित कन्या प्रशाला, चाकण ह्या माध्यमिक शाळेतील इ. ८वी/~~५ वी~~ चे वर्गास ( माध्यम मराठी/~~इंग्रजी~~ ) सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य ३(७) नमाशा/मान्यता/पुवि. दि. ९/१/९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. ससन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून आप माध्यमिक शाळेत इ. ~~६ वी~~, ~~७ वी~~, ९ वी, ~~१० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी ~~उपशिक्षणाधिकारी~~, ~~शिक्षण-माध्य~~ जि.~~प.~~पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती खेड यांचे कार्या संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाक सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(सही)
शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे. करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९६
पुणे, दि. ८/७/९६.

प्रति, BOOK-POST

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

क्रांती कन्या प्रशाळा, चाकण.

ता. खेड, जि. पुणे.



विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९६ -९७, इ. ~~६ वी, ७वी, ९वी~~, १०वी.

आपल्या क्रांती शिक्षण संस्था, चाकण द्वारा संचलित कन्या प्रशाळा, चाकण. ह्या माध्यमिक शाळेतील इ. ८वी/५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९४ - ९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य३(७९)नमाशा/मान्यता/पुवि/९४ दि. ७/३/९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. ~~य~~सन १९९६ - ९७ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ~~६ वी, ७ वी, ९ वी~~, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची ------ वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी ~~उपशिक्षणाधिकारी, शिक्षण माध्यमिक जि.प. पुणे~~/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती खेड यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे. करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन "
जिल्हा परिषद पुणे. शिक्षण माध्यमिक,
शिक्षण/माध्य/ह-४/प्रथम मान्यता/९६-९७.
पुणे दि. २७/२/९७.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
कन्या विद्यालय, चाकण, ता. खेड.

विषय :- इ.१०वी वर्गास प्रथम मान्यता सन ९६-९७.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कडील पत्र क्रं. माध्य ३/प्रथम मान्यता/पुवि/ ९६ दि.—

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या कन्या विद्यालय, चाकण ता. खेड. या मराठी/~~इंग्रजी~~ माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १०वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन १९९६ - ९७ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.

२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.

३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाला साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.

४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन ग्रंथाची भर घालावी.

५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.

६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.

७] शैक्षणिक, कार्यानुभव, व क्रीडा साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.

८] शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर असावा.

९] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.

१०] वाढीव फीचे दर मा. शि. संचालक, महरा. पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.

११] माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.

१२] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.

१३] शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी.. खाती उघडावीत.

१४] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करुन घेण्यात यावी.

१५] अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

[signature] २७/२/९७.
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे करिता

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५वी/२००१.
पुणे, दि. २१.५.२००१.

प्रति,

मुख्याध्यापक,
कन्या विद्यालय, मेदनकरवाडी-चाकण.
ता. खेड, जि. पुणे.

विषय :- इ. ५ वी ते ७ वी वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील पत्र क्र. माध्य-३/१३/५वीते७वी/पुवि/०१/६८६०, दि. १७.५.२००१.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपणास कळविणेत येते की, आपल्या माध्यमिक शाळेत इ. ५ वी चा वर्ग सुरु करणेस जून २००० पासून विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

अटी :- १. इ. ५वी ते इ. ७वी च्या वर्गांची परवानगी ही विनाअनुदान तत्वावर राहील.

२. मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने/करणे आवश्यक आहे.

३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

४. सदर शाळेची ५ वी मान्यता अनुदान सूत्रासाठी सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून ग्राह्य धरावी.

J. N. H[illegible]
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जि. प. पुणे

प्रत,

गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती राजगुरुनगर-खेड.

२/- माध्यमिक शाळा तपासणीचे वेळी इ. ५ वी, ६वी वर्गांची तपासणी करणेत यावी. [ २००१-२००२ शै. वर्षी]

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]

जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै. वा. /०२-०३

पुणे, दि. १९/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

कन्या प्रशाला, मेदनकरवाडी - चाकण

ता. खेड.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३

इ. ६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी, इ. १० वी.

आपल्या क्रांती शिक्षण संस्था चाकण
या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित कन्या प्रशाला मेदनकरवाडी - चाकण
माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी /इ. ५ वी या वर्ग सुरु करणेस सन २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/५ ते ५/पुवि/६८०/२००२-०३ , दि. २७/५/०२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी, इ. १० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे / गट शिक्षणाधिकारी, पं. स. खेड यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

J.N.H.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

## सांकेतिक क्रमांकासाठी प्रस्तावासोबत जोडावयाच्या प्रमाणपत्रांची यादी.

१. मुखपृष्ठ पत्र.

२. विहित नमून्यातील शिफारस प्रपत्र [इंग्रजी व मराठी]

३. या कार्यालयाने दिलेल्या शाळा परवानगी पत्राची प्रत.

४. या कार्यालयाने दिलेल्या प्रथम मान्यता पत्राची प्रत.

५. इ. ९ वी, इ. १० वी नैसर्गिक वाढीने परवानगी पत्र.

६. शाळा वाहर्षिक तपासणी अहवाल.

७. संस्थेची घटना. [झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली.]

८. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी. मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली.

९. इ. १० वी तील विद्यार्थ्यांची यादी.

१०. शासन निर्णय व खात्याचे नियम काटेकोरपणे पालन करणेबाबत संस्थेचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थाप्रमुखाचे हमीपत्र.

११. संस्थेविरुध्द गैरव्यवहाराबाबत अथवा न्यायालयात प्रकरण नसलेबाबत संस्था प्रमुखाचे हमीपत्र व त्यावर संबंधित तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी.

सदर कागदपत्र दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावी व एक प्रत विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करावी.

पुणे यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे जिल्हा परिषद, पुणे
[ शिक्षण माध्यमिक ]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-३/०४-०५

BOOK-POST

दिनांक : २८-१०-२००४.

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
कन्या विद्यालय
चाकण
ता. खेड जि. पुणे

विषय :- मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत.....

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा. शा. अ-१००३/[३८०/२००३]/मा. शि.-१, दिनांक १३ ऑगस्ट २००४

२] मा. शिक्षण संचालक [माध्य. व उच्च माध्यमिक] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमाशा १००४/ /२००४-०५/जा. तु. मंजूरी/१५-क व दिनांक ८/९/२००४ चे पत्र

~~३] मा. शिसप उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक दिनांक चे पत्र.~~

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, सन २००१ -०२ २००२-०३ व २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यास आलेली पटपडताळणी व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करुन आपल्या विद्यालयास पुढील प्रमाणे नविन तुकडया त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यास येत आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्याही शैक्षणिक वर्षापासून | जादा/ नैसर्गिक वाढीने | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | ९वी | २री | २००१/०२ | नैस. वाढीने | विनाअनुदानित |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |

Rece. on 7/11/04.

CHAKAN DELY 8.11.04

उपरोक्त तुकडया पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१] विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांना दिनांक १४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील अनुदान सुत्र किंवा जेव्हा त्या तुकडया अनुदानास पात्र ठरून अनुदानावर आणल्या जातील, त्यावेळी जे अनुदानाचे सूत्र असेल ते लागू राहील.

२] अशा तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार निकषपात्र तुकडयांना शासन अनुदान लागू करीत असते हे अनुदान भूतलक्षी-प्रभावाने लागू केले जाणार नाही. जेव्हा पासून अनुदान सुरु करण्यात येईल त्यावेळी अशा तुकडयांना ज्या टप्प्यावरील अनुदान देय राहील त्या टप्प्यावरील अनुदान लागू करण्यात येईल, तत्पूर्वीचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

३] नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त अति - रिक्त तुकडया या केवळ कायम विनाअनुदान-तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत. अशा तुकडया अनुदानास पात्र असणार नाहीत. ४

४] कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेच्या नवीन जादा तुकडया कायम विना अनुदान तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत अशा तुकडया देखील अनुदानास पात्र असणार नाहीत.

जादा मंजूर तुकडयानुसार सेवकसंच मान्य करून घेणे व नवीन पदावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता घेणे याबाबत त्वरीत कार्यवाही करून दयावी.

शिक्षणाधिकारी [माध्य.]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.